20 SEP 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबईतील डबेवाल्यांचा विद्यापीठात क्लास

## मुंबईतील डबे वाहतूक मंडळाचे अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांनी केले मार्गदर्शन : तंत्रज्ञानाच्या जगात डबेवाल्यांच्या स्ट्राँग नेटवर्कची दिली माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मुंबईत १८९० साली शंभर डब्यांपासून डबे व्यवसायाला सुरूवात झाली होती. आता ५ हजार डबेवाले ८०० मुकादम आणि २ लाख जेवणाच्या डब्यांचे वितरण केले जाते. वार्षिक उत्पन्न ५५ कोटी रूपये आहे. डबेवाल्यांची चौथी पिढी हा व्यवसाय करत आहे. त्यांना डबा वेळेत पोहोचवण्याची कला गवसली आहे. डबेवाल्यांच्या मॅनेजमेंटचा विद्यापीठात क्लास घेत, आधुनिक युगातही कोणत्याही तंत्रज्ञानाशिवाय डबेवाल्यांचे नेटवर्क स्ट्राँग असल्याची माहिती मुंबई डबे वाहतूक मंडळाचे अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागामार्फत आयोजित 'इंडक्शन प्रोग्रॅम'मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख अध्यक्षस्थानी होते.

मेडगे म्हणाले, एक डबेवाला जवळपास ६० किलो जेवणाच्या डब्यांची डोक्यावरून वाहतूक करतो. डबेवाल्यांची ही चौथी पिढी असल्याने त्यांना घरातूनच प्रशिक्षण मिळते. डबेवाले पायी, सायकल, ट्रेनने प्रवास करत असल्याने पर्यावरण



कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना मुंबई जेवण डबे वाहतूक संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ मेडगे. सोबत डॉ. उमेश गडेकर, डॉ. महादेव देशमुख, डॉ. नितीन माळी.

संवर्धनही करतात. डबे त्वरीत घरपोच करण्यासाठी अनेक कंपन्या कार्यरत असल्या तरीही डबेवाल्यांच्या व्यवसायावर काहीही परिणाम होत नाही.

डॉ. देशमुख यांनी शिवाजी विद्यापीठातील कौशल्य आधारित योजना आणि नवसंशोधन व नाविन्यतेबाबत माहिती दिली. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजश्री मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, संशोधक, शिक्षक उपस्थित होते.

### डब्याला कलर कोडींग केले जाते

कोणत्या भागातील डबा कोणता, याची माहिती मिळण्यासाठी हिरवा, निळा आणि लाल रंगाचे कोडींग केले आहे. कोडींगमुळेच विलेपार्ले ते नरिमन पॉईंटपर्यंत प्रत्येक भागात डबा व्यवस्थित पोहोचतो. शिक्षण घेतले नसले तरी डबेवाल्यांचे टाईम मॅनेजमेंट चांगले असते. त्यामुळेच कमाईबाबत मुंबईच्या डबेवाल्यांचा नंबर देशातील पहिल्या ५० लोकांमध्ये आहे.

### लंडनचे प्रिन्स चार्ल्स आणि डबेवाल्यांची भेट

डबेवाल्यांचा व्यवसाय कसा चालतो, हे पाहण्यासाठी लंडनचे प्रिन्स चार्ल्स मुंबईला आले होते. लंडनचे प्रिन्स असूनसुध्दा ते डबे वितरणाच्या ठिकाणी येऊन डबेवाल्यांना भेटले. त्यांच्या भेटी दरम्यान डबे वितरणात कोणताही अडथळा आला नाही. कोहीनूर हिरा जेथे आहे, तेथे आम्ही भेट दिलेला डबा ठेवला आहे. त्यांच्या दुसऱ्या लग्नाला त्यांनी डबेवाल्यांना खास निमंत्रित केले होते. डबेवाले त्यांच्या लग्नाला जाऊन आले. त्यांनी केलेल्या कौतुकाने आम्हाला ऊर्जा मिळाली.

### रिचर्ड ब्रैनसन यांनी डबेवाल्यांच्या मॅनेजमेंटचा केला अभ्यास

वर्जिन ग्रूपचे संस्थापक रिचर्ड ब्रैनसन डबेवाल्यांचे मॅनेजमेंट पाहण्यासाठी मुंबईला आले, त्यांनी चक्क डबेवाल्यांच्या वेशभूषेत दादरमधून चर्चगेटपर्यंत रेल्वेने प्रवास केला. मॅनेजमेंटचा अभ्यास करून त्यांनी ट्रेनमधील फोटो कंपनीत लावला असून, डबेवाल्यांसारखे काम करा, असा संदेश ते अधिकारी व कर्मचाऱ्यांना देतात.

लोकमत

# ‘ओझोन’च्या संवर्धनासाठी झाडे लावा : शिंदे

कोल्हापूर : ओझोनमुळे पृथ्वीवरील सर्व जिवांचे हानिकारक किरणांपासून संरक्षण होत आहे. मात्र, वाढते प्रदूषण, घातक घटकांचा वाढता वापर यामुळे या थरांचे नुकसान होत आहे. त्यांच्या संवर्धनासाठी अधिकची झाडे लावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, इंडियन सोसायटी फॉर हिटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स आदींतर्फे ‘ऊर्जा व पर्यावरणीय समस्या’ यावर कार्यशाळा झाली. सुरेश पाटील, पी. पी. पुंगावकर उपस्थित होते. सुनील भाटवडेकर यांनी माहिती दिली. संदीप चोदनकर, डॉ. एस. एन. सपली यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर, सहा. प्राध्यापक एस. बी. पोर्लेकर, गणेश शिंदे यांनी संयोजन केले.

Times of India

# A PERFECT BOW

TOI



A rainbow creates a perfect frame for the statue of Chhatrapati Shivaji Maharaj in front of the main building at the Shivaji University, Kolhapur, on Tuesday evening

पुढारी

# बी.टेक. अभ्यासक्रम पुरवणी परीक्षेसाठी आजपासून अर्ज प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने संलग्न महाविद्यालयातील बी.टेक. (सीबीसीएस) अभ्यासक्रमांच्या प्रथम ते अंतिम वर्षातील इयर डाऊन विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा ४ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. विद्यार्थ्यांना २० ते २२ सप्टेंबर दरम्यान विनाविलंब शुल्क अर्ज करता येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेतंर्गत संलग्न महाविद्यालयातील बी.टेक. (सीबीसीएस) अभ्यासक्रमांच्या प्रथम ते अंतिम वर्षातील इयर डाऊन विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा विद्यापीठ घेणार आहे. महाविद्यालयाने २२ रोजी परीक्षा अर्ज अॅप्रुव्ह करून २५ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठात भरलेले अर्ज करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

20 SEP 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

# प्रत्येक दिवस महत्त्वाचा

डॉ. व्ही.एन. शिंदे

मागील आठवड्यात लिबियात पूर आला. सहा हजारांपेक्षा जास्त लोक मृत्युमुखी पडले. तीस हजारांपेक्षा जास्त लोक बेपत्ता आहेत. लिबियात आलेल्या महापूर, चक्रीवादळाने जनजीवन विस्कळीत झाले होते. कमी वेळात जास्त पाऊस पडला आणि त्यात धरण फुटले. याचा फटका डेरना शहरास बसला. अर्ध्याहून अधिक शहर वाहून गेले. पुराच्या पाण्याचा जोर इतका होता की, शहरामध्ये मदतकार्य करणे अवघड झाले. सर्व रुग्णालये प्रेतांनी भरून गेल्याचे लिबियाच्या आरोग्यमंत्र्यांनी सांगितले. दोनच दिवसांत मृतांचा आकडा वीस हजारांपेक्षा जास्त असल्याचे सरकारी सूत्रांनी जाहीर केले. डॅनियल वादळानंतर आलेल्या महापुराच्या आपत्तीला डेरना शहराला सामोरे जावे लागले.

लिबिया एक उदाहरण आहे. नुकतेच घडलेले. त्यापूर्वी हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, उत्तराखंड या भारतातील भागात पुराने हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले. पाऊस हाच यामागे आहे. मात्र निसर्गचक्र असे बदलत आहे की, ते सर्वसामान्य मानवाच्या आकलनाच्या बाहेर आहे. पर्यावरणाप्रती जागरूकता निर्माण व्हावी. लोकांचा पर्यावरण संवर्धनामध्ये सहभाग वाढावा यासाठी युनो आणि विविध देशांमार्फत कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. दिन साजरे करण्यात येतात. १४ जानेवारीला भूगोल दिन, २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन, २० मार्चला जागतिक चिमणी दिवस, २१ मार्चला जागतिक वन दिन, २२ मार्चला जागतिक जल दिन, २३ मार्चला जागतिक हवामान दिवस, ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. नुकताच १६ सप्टेंबर रोजी ओझोन दिवस जागतिक पातळीवर साजरा करण्यात आला.

या दिवसांचे औचित्य साधत जगभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. विद्यार्थी आणि नागरिक यांच्यामध्ये विविध प्रश्नांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येतात. इंटरगव्हर्मेंटल पॅनेल फॉर क्लायमेट चेंज या संस्थेने वारंवार पर्यावरणाचे रक्षण केले नाही तर काय दुष्परिणाम संभवतात याबद्दल इशारे देण्यात येतात. अहवाल दिले जातात. त्याबद्दल संशोधक गळा कोरडा होईपर्यंत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र हा इशारा इतरांसाठी आहे, आपल्यासाठी नाही, असे प्रत्येकजण मानतो आणि प्रश्न आहे तेथेच राहतो.

जागतिक तापमान वाढ ज्या वेगाने होत आहे, ते पाहता २०५० सालापर्यंत काय काय भोगावे लागणार आहे, याची कल्पनाही करवत नाही. आयपीसीसीचा अहवाल जागतिक तापमानवाढीमुळे निसर्ग लहरी बनणार असे सांगतो. मात्र हा बदल मानवाच्या पर्यावरणातील अवाजवी हस्तक्षेपामुळे होत आहे. वृक्षांची बेसुमार कत्तल हा यातील महत्त्वाचा भाग. वृक्षतोडीमुळे जमिनीची होणारी धूप, माती नापीक होणे असे अनेक परिणाम होतात. दुसरीकडे वाढते औद्योगिकीकरण, वाहनांचा वाढता वापर, विज्ञान आणि तंत्रज्ञानातून ऊर्जेची वाढणारी गरज, त्यासाठी होणारा इंधनांचा अवाजवी वापर, अशा अनेक कारणांमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. हा समतोल साधण्यासाठी वृक्षांची लागवड करायलाच हवी. मात्र वृक्षांचे प्रमाण घटत असताना प्रदूषण करणाऱ्या कारणांमध्ये घटही करायला हवी.

कोरोनाचे संकट सुरू झाले आणि पृथ्वीवर महासंकट ओढवले. आपण पृथ्वीवर वायूच्या महासागराच्या तळाशी राहतो, असे टोरीसेली या संशोधकाने सतराव्या शतकात सांगितले. या हवेच्या महासागराच्या पृष्ठभागी १५ ते ३५ किलोमीटर अंतरावर ओझोनचा थर आहे. ओझोन, ऑक्सिजनचे एक संयुग आहे. ऑक्सिजनचे तीन अणू एकत्र आल्यानंतर ओझोनचा एक रेणू बनतो. आपण श्वासाद्वारे जो प्राणवायू घेतो, तो ऑक्सिजनचे दोन अणू एकत्र येऊन बनतो. जमिनीवरील प्राणवायू मानव, सजीवांसाठी अत्यावश्यक आहे. मात्र, वरचा ओझोनचा थर अतिनील किरणांना थोपवून धरण्याचे कार्य करतो. एका अभ्यासानुसार अतिनील किरणांमध्ये दहा टक्के वाढ झाल्यास त्वचेच्या कर्करोगाचे पुरुषांमध्ये १९ टक्के आणि स्त्रियांमध्ये १६ टक्के प्रमाण वाढते. चिलीमध्ये हेच प्रमाण ४६ टक्क्यांनी वाढल्याचे आढळून आले. हा थर विरळ झाल्यास किंवा नष्ट झाल्यास मोतीबिंदूच्या तक्रारी वाढतील. त्यामुळे ओझोन थराला जीवनरक्षक म्हटले जाते. या जीवनरक्षक थराला जून २०२० मध्ये मोठे छिद्र पडले होते.

दरवर्षी ओझोन थराला दक्षिण ध्रुवावर असे छिद्र पडते. मात्र त्यावेळी पडलेले छिद्र आपोआप बुजले जाते. २०२० मध्ये उत्तर ध्रुवावर ओझोन थराला पडलेले छिद्र दहा लाख चौरस किलोमीटर इतके मोठे होते. ओझोन थराचे छिद्र कमी करण्यामध्ये ढग, क्लोरोफ्लुरोकार्बन आणि हायड्रोफ्लोरोकार्बनची मोठी भूमिका असते. उत्तर ध्रुवावर पडलेले छिद्र हा संशोधकांना मोठा धक्का होता. त्यावेळी पृथ्वीचा विनाश जवळ आला आहे आणि हे छिद्र कधीच बुजले जाणार नाही, असे अनेक संशोधकांचे मत होते. जर हे ओझोनचे छिद्र बुजले गेले नसते तर उत्तर ध्रुवावरील बर्फाचे थर वितळले गेले असते. त्यामुळे समुद्राची पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढली असती. अनेक शहरे पाण्याखाली गेली असती. त्या भागातील सजीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला असता. मात्र त्यावेळी कोरोनाचे संकट हे सहायकारी ठरले. अनेक संशोधकांचे या छिद्राच्या हालचालीवर बारीक लक्ष होते. कोरोनाच्या काळात कोरोनाच्या भीतीने सर्वत्र लॉकडाऊन झाले. सर्व कारखाने, उद्योगधंदे बंद झाले. वैयक्तिक वाहने मोठ्या प्रमाणात जागेवर थांबली. वातावरणातील प्रदूषण कमी झाले आणि एका संकटाने दुसरे संकट दूर केले.

निसर्ग हा समतोल साधण्याचा प्रयत्न करतो. कोरोनाचे संकट आपण दूर केले. त्यावरील लस बनवली. २०२० मध्ये सारे जग तोंड झाकून फिरत होते, ते आज मोकळा श्वास घेत आहे. मात्र कोरोनाच्या संकटाने ओझोनच्या थराला पडलेले छिद्र बुजवले. मात्र त्यावेळी लॉकडाऊन नसते तर काय हाहाकार उडाला असता याची कल्पनाच करवत नाही. आज कोरोनासह निसर्गाने वारंवार दिलेले दाखले समजून न घेता मानवाने आपले वागणे तसेच ठेवले आहे. पुन्हा ऊर्जेचा बेसुमार वापर सुरू झाला आहे. प्रदूषके अशीच वाढत आहेत. जागतिक तापमान वाढ होतच आहे. पृथ्वीचा धोका वाढत आहे. निसर्गस्नेही जीवनशैली आपलीशी करणे महत्त्वाचे आहे. मात्र, आपण असेच वागत राहिलो तर पृथ्वीवरील जीवसृष्टीचा विनाश अटळ आहे. २०५० सालापर्यंत पृथ्वीवरील समुद्र किनाऱ्यावरील मोठ्या मानवी वस्त्या समुद्राच्या पाण्याखाली जाण्याचा धोका संभवतो आहे. मुंबई, चेन्नई आणि कलकत्त्यासह अनेक शहरांना हा धोका आहे. जगभरातील अनेक छोटी बेटे पाण्याखाली जाणार आहेत. त्यामुळे प्रत्येक दिवस महत्त्वाचा मानून निसर्ग, निसर्गातील जैवविविधता वाचवण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याची गरज आहे. नाही तर आजचा दिवस आपला म्हणत, उद्याची चिंता वाहावी लागेल.

संपर्क : ९६७३७७८४००